# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 26/06/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन कुहीची कार्यवाही

दिनांक २५/०६/२०२३ रोजी ०८.०० वा. ते ०८.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ पोलीस स्टेशन कुही हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे कुही हद्दीतील १० किमी अंतरावर मौजा अडम येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रॅक्टर ट्राली व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफने नमुद घटनास्थळी नाकाबंदी करून टॅक्टर ट्रॉली चालक **आरोपी नामे— संदीप वामनराव बुढढे, वय २५ वर्ष रा. मांढळ ता. कुही** हा त्याचे ट्रॅक्टर क्र. एम. एच. —४०/सी. ए.—५८७५ व ट्रॉलीचा क्र. एम. एच.—४० सी. ए. —३६३० किंमती अंदाजे ५,००,०००/—रू. रु. व त्यामध्ये ०१ ब्रास रेती किंमती अंदाजे ३०००/—रु असा एकूण ५,०३,०००/—रुपयाचा मुद्देमाल सदर ट्रॅक्टर चालकाकडे रॉयल्टी नसल्याने अवैधरित्या चोरी करुन वाहतूक करीत असतांना मिळून आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस नायक हरीदास चाचेरकर, ब. नं. २०७१ पो.स्टे. कुही यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास सफौ/७५३ रमेश ताजने मो. नं. ९८२२७१४०५३ हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. अरोली :— अंतर्गत ०७ कि.मी अंतरावरील मौजा कोदामेंढी येथे दिनांक २५/०६/२०२३ चे १८/४५ वा. ते १९/३० वा. चे दरम्यान पोलीस स्टेशन अरोली येथील पोलीस स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, एक इसम अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रॅक्टर ट्राली व्दारे चोरटी वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून मौजा कोदामेंढी ते सावंगी रोड पुलीया येथे सुर नदिचे पात्रात एक ट्रॅक्टर चा चालक रेती चोरी करुन अवैधरित्या रेतीची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने त्याने त्याचे ट्रॉलीतील रेती हॅंड्रोलिकने खाली करुन पळुन जात असता स्टाफचे मदतीने पकडुन सदर ट्रॅक्टर क्र. एम. एच. —४०/एम. —२५१२ किंमती अंदाजे ३,००,०००/— रु. व लाल रंगाची ट्रॉली क्र. एम. एच. —४०/ एल.—३६९८ किंमती अंदाजे १,५०,०००/—रु. चा. असा एकुण ४,५०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी अमोल राजु बावनकुळे, वय ३० वर्षे, रा. कोदामेंढी ता. मौदा जि. नागपूर** यास अरोली पोलीसांनी ताब्यात घेतले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस नायक ब. नं. २०४५ संदिप बाजनघाटे वय ४० वर्षे रा. पो.स्टे. अरोली

यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. महेश बोथले पो.स्टे. अरोली मो. नं. ९८९०३७५३९६ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. अरोली :–** दिनांक २५/०६/२०२३ चे १८/०० वा. ते १८/३० वा. चे दरम्यान फिर्यादी ही तिचे घरासमोर नळाचे पाणी भरण्यास गेली असता यातील **आरोपी क्र. ०१) नामे– विनोद भैय्याजी बांगरे, वय ४० वर्षे व ०२) महिला आरोपी दोन्ही रा. मोरगाव ता. मौदा जि. नागपूर** हे तिथे पाणी भरण्यास हजर होते तेव्हा फिर्यादी ही पहीले आल्या असल्याने ती पाणी भरण्यास गेली असता आरोपी क्र. ०२ ही ''मला पाणी भरु दे'' असे म्हणुन शिवीगाळी करीत होती तेव्हा फिर्यादीने हटकले असता आरोपी क्र. ०१ हा ''तु माझ्या पत्नीला पाणी का बर नाही भरु देस'' असे बोलुन शिवीगाळी केली व फिर्यादीला लज्जा निर्माण होईल असे कृत्य करुन तिचा विनयभंग केंला व दोन्ही आरोपीतांनी शिवीगाळी करुन मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५४, ५०४, ५०६, ३४ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार टिकाराम जाधव ब. नं. १३३१ मो. नं. ८८८८८२१३७६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**